महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे १.
दूरध्वनी क्र .२०-२६१२२७५२ ईमेल§ sakalyanpuneest@gmail.com

वाचा:- १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सकआ-२००१/प्र.क्र.२५१/आरथा-२/दि. २७ फेब्रुवारी, २००४.

२. सामान्य प्रशासन विभाग शासन पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३२१२ओ/१६-ब, दिनांक, २९.१२.२०१७.

३. सामान्य प्रशासन विभाग शासन निणर्य क्रमांक : बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७.०५.२०२१

४. दिनांक ५.३.२०२४ रोजी संपन्न झालेली विभागीय पदोन्नतीची समिती बैठक.

---

क्र.सकआ/आस्था-६/प्र-९/गट-क/लटले -नि.श्रेणी /पदो-आदेश/२०२३-२४/1065 दिनांक :26 /३/२०२४

## :- आदेश -:

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील मंजुर असलेल्या पदांचा आढावा वित्त विभागाच्या उच्चस्तरीय समितीने घेतला असून संदर्भ क्रमांक ३ च्या शासन पत्रान्वये केवळ पदोन्नती कोटयातील रिक्त असणारी पदे ही सेवाजेष्ठतेनुसार पदे भरण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्याअन्वये दिनांक १.०२.२०२४ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार कार्यरत लघुटंकलेखक संवर्गातून निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर सातव्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी वेतन बॅन्ड S -१५ (४१८००-१३२३००) या सुधारित वेतनश्रेणीतील " निम्नश्रेणी लघुलेखक " या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पद स्थापनेचे आदेश निर्गमित करीत आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव पदनाम व कार्यरत कार्यालयाचे ठिकाण | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | २ | ४ |
| १ | श्रीमती सुलभा प्रकाश मोरे, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग पुणे | प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे येथिल निम्नश्रेणी लघुलेखक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |

उपरोक्त नमूद लघुटंकलेखक यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे निम्नश्रेणी लघुलेखक या पदावर खालील अटींच्या अधीन राहून पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

१. मा. सर्वोच्चा न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञाप्ती याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. सदरची पदोन्नती ही वरील न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

.२ उपरोक्त कर्मचा-यांनी पदोन्नतीच्या पदावर हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांचे आत रुजू व्हावे, अन्यथा या कालावधीत रुजू न झाल्यास संबधित कर्मचायांना- पदोन्नतीचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच पदोन्नतीच्या पदावर रुजू न झाल्यास / पदोन्नती नाकारल्यास त्यांनी तात्काळ त्यांचे कार्यालयामार्फत आयुक्तालयास कळविण्यांत यावे व सदरहू आदेशान्वये पदोन्नती नाकारल्याची नोंद कार्यालय प्रमुख यांनी संबंधित कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तकात घ्यावी.

३. ज्या कर्मचा-यांना कालबध्द/आश्वासित प्रगती योजनेचा फायदा मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचा-यांनी त्वरीत पदावर रुजू व्हावे. त्यांनी पदोन्नती नाकारल्यास अथवा विहीत मुदतीत रुजू न झाल्यास त्याचे फायदे आपोआपच रद्द होतील.

४. पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्यानंतर वेतन निश्चितीच्या दृष्टीने एक महिन्याचे आत विकल्प देणे बंधनकारक राहील. तसे विकल्प न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र. ११ (१)(ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

५. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/ प्रक्र ३०३/ का-१२ दिनांक १२.९.२०१६ नुसार पदोन्नती नाकारल्यास त्याचा तिसऱ्या वर्षी पदोन्नतीसाठी विचार केला जाईल याची नोंद घ्यावी.

६. संबधित कार्यालय प्रमुख यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-याकडे कार्यभार असल्यास अन्य कर्मचाऱ्यांकडे सोपवून त्यांना तात्काळ पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे व कार्यमुक्त / रुजू अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुखांनी आयुक्तालयास त्वरीत सादर करावा.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

26.03.24

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :- माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

१. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग (सर्व)
२.सहाय्यक आयुक्त समाज कल्याण संबधित
३.कोषागार अधिकारी, सबंधीत.
४.संबंधित कर्मचारी.